महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे – ११.

## नियामक मंडळाची २१ वी बैठक दि.२३.०८.२०००

मा. ना. अजित पवार, मा. मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळ) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची २१ वी बैठक दि.२३.०८.२००० रोजी विधान भवन, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. २१/१

''ठराव करण्यात येतो की, २० व्या बैठकीतील मंजूर ठराव क्र.२०/१२ (अ) वगळून उर्वरित सर्व ठराव कायम करण्यात येत आहेत. ठराव क्र.२०/१२(अ) खालीलप्रमाणे दुरुस्त करुन कायम करण्यात येत आहे.

दुरुस्त ठराव क्र.२०/१२(अ)

ठराव करण्यात येतो की, कृष्णा पाणी तंटा लवादाचे संदर्भातील कामाची संपूर्ण कार्यवाही महाराष्ट्राच्या बाजूने परिपूर्णतेने करता यावी, तसेच त्यासाठी वरिष्ठ पातळीवरील बैठकांमध्ये इतर राज्यांप्रमाणेच स्वतंत्ररित्या मुख्य अभियंता स्तरावरील अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी राज्याची बाजू समर्थपणे व अधिकारितेने मांडता यावी यासाठी मुख्य अभियंता (कृष्णा पाणी वाटप तंटा लवाद) हे पूर्वी निर्माण केलेले पद पुनरुज्जिवित करण्यासाठी शासनास कळवावे व त्यासाठी आवश्यकतेनुसार पद समर्पित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा. तसेच परिशिष्ट-५ मध्ये उल्लेख केलेल्या कार्यकारी गटाच्या रचनेतील कॉम्प्युटर ऑपरेटर हे पद वगळण्यात यावे व उर्वरित सर्व पदे ही अस्तित्वातील पदे वर्ग करुन, कार्यकारी गट स्थापण्यात यावा.''

ठराव क्र. २१/२

'' ठराव करण्यात येतो की, परिशिष्ट क्र.२ मधील बिगर सिंचन पाणी पुरवठा परवाने मिळण्याबाबतच्या २ योजनांचे प्रस्तावांना, 'सदर प्रस्तावांचा पाणीवापर संबंधित प्रकल्पांच्या सुधारित जलनियोजनामध्ये समाविष्ट केला जाईल व दोन महिन्यांच्या पाणीपट्टीएवढी अनामत रक्कम पाणीवापर करणारी संस्था महामंडळाकडे भरेल. तसेच १९९० च्या शासन निर्णयानुसार आवश्यक तो संतुलन साठा (Balancing storage) स्वखर्चाने करील,' या अटींवर नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

ठराव क्र.२१/३

''ठराव करण्यात येतो की, परिशिष्ट क्र.४ मध्ये दर्शविलेल्या ३ मध्यम प्रकल्पांच्या सुधारित अंदाजपत्रकांना मा. सचिव (पा) व सदस्य, महामंडळ यांच्या सहमतीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे. तसेच ३३ लघु प्रकल्पांच्या अंदाजपत्रकांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. ''

ठराव क्र. २१/४

''ठराव करण्यात येतो की, धोम बलकवडी प्रकल्पांतर्गत बोगदा क्र.२ चे निर्गमन बाजूचे (पाले कडील) १९०० मी. चे काम, बोगदा क्र.१ चे कंत्राटदार मे. श्री. कुमार आणि कंपनी, बंगलोर यांच्याकडून बोगदा क्र.१ च्या निविदा दराने व शर्तीनुसार करुन घेण्याच्या कार्यवाहीस नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. ''

ठराव क्र. २१/५

''ठराव करण्यात येतो की, प्रस्तावित 'विषय क्र.५ - नवीन विश्रामगृहे बांधण्याबाबत' संदर्भात पुढील बैठकीत चर्चा करण्यात यावी.''

ठराव क्र.२१/६

''ठराव करण्यात येतो की, निविदा स्वीकृती लवाद निर्णय व कंत्राटविषयक मागण्या/क्लेम्स याविषयीच्या निविदा समिती व क्लेम्स समिती यांची रचना खालीलप्रमाणे सुधारित करण्यास तसेच कार्यकारी संचालक, कार्यकारी समिती, निविदा समिती व क्लेम्स समितीचे मंजुरीचे अधिकार यापुढे खालीलप्रमाणे ठेवण्यास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| (क) | कार्यकारी संचालक | | |
| १. | निविदा अधिक्य | - | ५% पर्यंत प्रचलित दरसूचीनुसार अधिक्य मंजुरी |
| २. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची निविदा | - | बोली अंदाजपत्रकीय दराचे तुलनेत १०% पेक्षाही कमी (Below) प्रचलित दरसूची नुसार |
| (ख) | कार्यकारी समिती | | |
| १. | निविदा अधिक्य | - | १०% पर्यंत प्रचलित दरसूचीनुसार |
| २. | लवाद निर्णय व कंत्राटविषयक मागण्या/क्लेम्स | - | रु. १५ लक्ष मर्यादेपर्यंत |

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

कार्यकारी समितीचे अधिकार (१ व २) मा. मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या मंजूरीच्या अधीन राहतील.

(ग) निविदा समिती

| निविदा समितीची रचना | वित्तीय अधिकार |
|---|---|
| प्रधान सचिव (वित्त) व सदस्य - समिती प्रमुख<br>कार्यकारी संचालक - सदस्य<br>वित्त सदस्य (महामंडळ) - सदस्य<br>मुख्य अभियंता (महामंडळ) - सदस्य<br>संबंधित क्षेत्रीय मुख्य अभियंता - सदस्य<br>अधीक्षक अभियंता - सदस्य सचिव | १. १०% पेक्षा जास्त अधिक्य असलेल्या निविदा एकमताने मंजूर करणे.<br>२. रु.१५ लक्ष ते ५० लक्ष पर्यंतचे लवाद निर्णय कंत्राटदारांच्या मागण्या/क्लेम्स एकमताने मंजूर करणे.<br>३. वरील अधिकार मा. मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या मंजुरीच्या अधीन राहतील. |

(ड) क्लेम्स समिती

| क्लेम्स समितीची रचना | वित्तीय अधिकार |
|---|---|
| प्रधान सचिव (वित्त) व सदस्य - समिती प्रमुख<br>कार्यकारी संचालक - सदस्य<br>वित्त सदस्य (महामंडळ) - सदस्य<br>मुख्य अभियंता (महामंडळ) - सदस्य<br>संबंधित क्षेत्रीय मुख्य अभियंता - सदस्य<br>महामंडळाचे कायदे सल्लागार - सदस्य<br>अधीक्षक अभियंता - सदस्य सचिव | रु. ५० लक्ष पेक्षा जास्त किंमतीचे लवाद निर्णय कंत्राटदारांच्या मागण्या, दावे, क्लेम्स एकमताने मंजूर करणे. हे अधिकार मा. मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या मंजुरीच्या अधीन राहतील. |

(ग) लवाद निर्णय व क्लेम्सच्या बाबत वरील कोणत्याही स्तरावर घेतलेले निर्णय कंत्राटदारास मान्य नसतील किंवा समितीमध्ये एकमत होत नसेल तर कार्यकारी संचालक ही बाब मा. मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या मान्यतेनंतर नियामक मंडळासमोर अंतिम निर्णयार्थ सादर करतील.''

ठराव क्र.२१/७

''ठराव करण्यात येतो की, इ.स. २०००-२००१ चा कार्यक्रम रु.२४३१ कोटीऐवजी किमान रु.२१०० कोटी इतका करण्यास व सदर कार्यक्रम मंत्रीमंडळाच्या नियोजन उप समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

ठराव क्र. २१/८

''ठराव करण्यात येतो की, इ.स. २०००-२००१ या आर्थिक वर्षात महामंडळाच्या उपलब्ध निधीमधून विनियोजनाद्वारे रु.६.०० लक्ष इतका निधी महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील राजपत्रित अधिकाऱ्यांना संगणक खरेदीसाठी प्रचलित शासन नियमांनुसार अग्रीम म्हणून मंजूर करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. इ.स. २००१-२००२ पासून महामंडळाच्या अंदाजपत्रकात संगणक खरेदी अग्रीमासाठी स्वतंत्र तरतूद ठेवण्यात यावी.''

ठराव क्र. २१/९

''ठराव करण्यात येतो की, वित्तीय संस्थाकडून दीर्घ मुदतीसाठी महामंडळास कर्ज मिळण्याची शक्यता तपशिलवार पडताळून पाहून शासनास स्वयंपूर्ण प्रस्ताव सादर करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.''

ठराव क्र. २१/१०

''ठराव करण्यात येतो की, राज्य शासनाकडून महामंडळास शिल्लक असलेले देय अंशदान रु. २१३६.७८ कोटी करिता सुधारित अंदाजपत्रकात आवश्यक ती तरतूद करण्यास व पुरक/सुधारित मागणीद्वारे डिसेंबर २००० आणि मार्च २००१ या दोन टप्प्यात महामंडळाकडील हातावरील तातडीचे दायित्व लक्षात घेता कमीत कमी रु. १००० कोटी अंशदान महामंडळास उपलब्ध करण्यास शासनास आग्रही विनंती करण्यास मंजूरी देण्यात येते.''

ठराव क्र. २१/११

''ठराव करण्यात येतो की,

१. 'ठराव करण्यात येतो की, २०००-२००१ या आर्थिक वर्षात रु.२१०० कोटी टप्प्याटप्प्याने सार्वजनिक रोखे विक्री, खाजगी रोखे विक्री, बिल डिस्काऊंटींग बँकामार्फत कर्ज यापैकी सोयीस्कर पद्धतीद्वारे उभारण्यास नियामक मंडळ मान्यता देत आहे.

२. ठराव करण्यात येतो की, २०००-२००१ या आर्थिक वर्षात रोखे विक्री प्रक्रियेसाठी लिड अरेंजर्स, विश्वस्त संस्था, निबंधक (Registrars to issue) रेटींग एजन्सी, कर सल्लागार, लेखा परिक्षक, बँकर्स, मुद्रक, जनसंपर्क संस्था व इतर आवश्यक संस्थांच्या नेमणूका मा. अध्यक्षांच्या संमतीने करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

३. ठराव करण्यात येतो की, २०००-२००१ या आर्थिक वर्षात रु.२१०० कोटी चा निधी उभारण्याच्या प्रक्रीयेसाठी लिड अरेंजर्स, विश्वस्त संस्था, रेटींग एजन्सी, निबंधक, फॉर्मस्, माहिती पुस्तके, जनसंपर्क मोहिम, जनसंपर्क सभा / बैठका, शुभारंभ, प्रोत्साहन रक्कम, शासनाची हमी फी इ.वरील आवर्ती व अनावर्ती खर्चाचा बाबनिहाय तपशील पुढील बैठकीमध्ये मंजुरीसाठी सादर करण्यात यावा.

४. ठराव करण्यात येतो की, खाजगी/सार्वजनिक रोखे विक्री, बिल डिस्काऊंटींग बँकाकडून कर्ज घेणे इ. निधी उभारण्याच्या संबंधातील सर्व प्रकारच्या कागदपत्रांवर, दस्तऐवजावर महामंडळातर्फे सह्या करणे, संबंधितांना सह्यांचे प्राधिकार महामंडळातर्फे प्रदान करणे, जमा रकमा खाते उघडणे, रोखे विक्री चालू करणे आवश्यकतेनुसार मुदतवाढ देणे व बंद करणे, रोखे वितरण करणे, रोख हस्तांतरण करणे व इतर सर्व आवश्यक त्या कृती/कार्यवाही करणे हे सर्व अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.

५. ठराव करण्यात येतो की, वरील (१) मधील रोखे वितरण करण्यासाठी व बिल डिस्काऊंटींगबाबत आवश्यक तो त्रिपक्षीय करार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन व विश्वस्त संस्था किंवा बँका यांच्यामधील यापूर्वी केलेल्या त्रिपक्षीय करारानुसारच असावा व त्यावर स्वाक्षरी करण्याचे प्राधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत. तसेच करारातील मसुद्यामध्ये शासन निर्देश देईल त्याप्रमाणे वाढ/बदल करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. २१/१२

"ठराव करण्यात येतो की, पाणी वापर, पिकांचे नियोजन, प्रक्रिया संस्थाची व विक्री संस्थाची गरज व नियोजन कसे करावे या संबंधीचा सखोल अभ्यास करुन सर्वेक्षण अहवाल तयार करण्यासंबंधीचा मे. मिटकॉन, पुणे या संस्थेने तयार केलेला प्रस्ताव स्विकारण्यास नियामक मंडळ मान्यता देत आहे. प्रस्तावास येणाऱ्या खर्चाबाबत तपासणी करुन, त्या बाबत मा. अध्यक्ष यांची पूर्व अनुमती घेऊन, कार्यकारी संचालक यांना मंजूरी देण्याचे अधिकार देण्यात येत आहेत."

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

ठराव क्र. २१/१३

" ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या वित्त व लेखा शाखेकडील कामकाजासाठी अतिरिक्त पदे मंजूर करण्याच्या विषयावर पुढील बैठकीत चर्चा करण्यात यावी."

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

परिशिष्ट क्र.४

## सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केलेले प्रकल्प

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव | सुधारित प्रशासकीय मान्यतेची किंमत रु.लक्ष/दरसूची वर्ष |
|---|---|---|
| | **मध्यम प्रकल्प** | |
| | **जिल्हा अहमदनगर** | |
| १. | सीना मध्यम प्रकल्प, ता. कर्जत | ११८९४.०२/९९-२००० |
| | **जिल्हा कोल्हापूर** | |
| २. | जांबरे मध्यम प्रकल्प, ता. चंदगड | ६६०३.४०/९६-९७ |
| ३. | चिकोत्रा मध्यम प्रकल्प, ता. आजरा | १३७९४.१३/९९-२००० |
| | **लघु प्रकल्प** | |
| | **जिल्हा पुणे** | |
| १. | को.प.बं.फोंडवाडा, ता.बारामती | ४६.९६/९३-९४ |
| | **जिल्हा सांगली** | |
| २. | ल.पा.त.बेळुंखी, ता.जत | ५२०.५१/९६-९७ |
| ३. | ल.पा.त टाकवे, ता.शिराळा | ३०६.९५/९६-९७ |
| ४. | ल.पा.त वाकुर्डे, ता.शिराळा | १५८.५४/९६-९७ |
| ५. | ल.पा.त ढवळेश्वर, ता.खानापूर | ३१७.९५/९६-९७ |
| ६. | ल.पा.त भाकुचीवाडी, ता.खानापूर | ६४९.१३/९६-९७ |
| | **जिल्हा कोल्हापूर** | |
| ७. | ल.पा.त.खडकओहोळता.चंदगड | ५६५.२४/९७-९८ |
| ८. | ल.पा.त कोंडोशी, ता.भुदरगड | ८२२.४९/९९-२००० |
| | **जिल्हा अहमदनगर** | |
| ९. | ल.पा.त.जाधववाडी, ता.पारनेर | २९१.५८/९९-२००० |
| १०. | को.प.बं.कोहोकडी, ता.पारनेर | ६३.२५/९६-९७ |
| ११. | को.प.बं.वाळुंज, ता.नगर | ९८.९८/९६-९७ |
| १२. | को.प.बं.चिंचोडीपाटील,ता.नगर | ७७.११/९७-९८ |
| १३. | को.प.बं.गिरवली, ता.जामखेड | ७६.४८/९७-९८ |
| | **जिल्हा उस्मानाबाद** | |

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

Resolution_dir_meet_21

| अ क्र | प्रकल्पाचे नाव | सुधारित प्रशासकीय मान्यतेची किंमत रु. लक्ष/दरसूची वर्ष |
|---|---|---|
| १४. | ल.पा.त.तांबेवाडी, ता.परांडा | ५९१.८९/९५-९६ |
| १५. | ल.पा.त. काटी दहिवडी.ता.तुळजापूर | ३५९.५५/९७-९८ |
| १६. | ल.पा.त. इंगरगा (नळ).ता.तुळजापूर | ७७८.०६/९६-९७ |
| १७. | सा.त.कोंळेगाव, ता.तुळजापूर | ८८७-५७/९५-९६ |
| १८. | ल.पा.त.सांगवी (मा).ता.तुळजापूर | ४५३.१४/९४-९५ |
| १९. | सा.त.सिंदगांव, ता.तुळजापूर | ३१४.०९/९६-९७ |
| २०. | सा.त.केसरजवळगा, ता.उमरगा | २९६.२९/९५-९६ |
| २१. | सा.त.डिग्गी, ता.उमरगा | २४३.८१/९६-९७ |
| २२. | सा.त.वलगुड, ता.उस्मानाबाद | १९४.७३/९६-९७ |
| २३. | ल.पा.त.बेंडकीनाला.ता.उस्मानाबाद | ६६९.२७/९६-९७ |
| २४. | सा.त.येरमाळा, ता.कळंब | २५९.००/९५-९६ |
| २५. | सा.त.वडजी, ता.कळंब | ३४६.०२/९५-९६ |
| २६. | ल.पा.त.पाथ्रुड.ता.भूम | ३७६.७१/९५-९६ |
| २७. | ल.पा.त.जांब.ता.भूम | ५४२.२६/९६-९७ |
| २८. | सा.त.सुलेमान देवळा (कडाणी).ता.आष्टी | ५९२.७७/९६-९७ |
| २९. | सा.त.धामनगाव, ता.आष्टी | १९८.१२/९५-९६ |
| ३०. | को.प.सांगवी संगमेश्वर.ता.आष्टी | १९३.७०/९५-९६ |
| ३१. | को.प.बं.खडकत क्र.२.ता.आष्टी | १९०.१०/९६-९७ |
| ३२. | ल.पा.त.पारगांव (जो) क्र.२.ता.आष्टी | २५०.४२/९६-९७ |
| ३३. | सा.त.रामेश्वर (सौताडा).ता.पाटोदा | ४८६.०४/९६-९७ |

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

Resolution dir meet 21

परिशिष्ट क्र.५

## कृष्णा पाणी वाटप तंटा लवाद कार्यकारी गट

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मुख्य अभियंता (गट प्रमुख) | - | १ पद (पुनरुज्जीवनाने) |
| २. | अधीक्षक अभियंता | - | १ पद |
| ३ | कार्यकारी अभियंता | - | २ पदे |
| ४. | उप विभागीय अभियंता | - | ४ पदे |
| ५. | सहाय्यक अभियंता/शाखा अभियंता | - | ८ पदे |
| ६. | आरेखक | - | १ पद |
| ७. | अनुरेखक | - | ३ पदे |
| ८ | अधीक्षक | - | १ पद |
| ९. | प्रथम लिपिक | - | २ पदे |
| १०. | वरिष्ठ लिपिक | - | २ पदे |
| ११. | कनिष्ठ लिपिक | - | ३ पदे |
| १२. | टंकलेखक | - | ४ पदे |
| १३. | दप्तरी | - | १ पद |
| १४. | शिपाई | - | ८ पदे |
| १५. | चौकीदार | - | २ पदे |
| १६. | वाहन चालक | - | ४ पदे |
| १७. | उच्चस्तर लघुलेखक | - | २ पदे |
| १८. | निम्नस्तर लघुलेखक | - | २ पदे |

(अनुक्रमांक २ ते १८ :) अस्तित्वातील पदे वर्ग करुन

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे
Resolution dir meet 21

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे